दिनांक : ०१/०१/२०२५
बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय.

# प्रेस नोट

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मोटार वाहन चालकांविरूध्द कारवाई करण्याकरीता मा. पोलीस आयुक्त, मा. विशेष पोलीस आयुक्त व मा. पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), बृहन्मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

सदरची मोहिम दिनांक ३१/१२/२०२४ रोजीचे रात्री २०:०० वा. पासुन ते दिनांक ०१/०१/२०२५ चे सकाळपर्यंत आयोजित करण्यात आली. सदर माहिमे दरम्यान १०७ ठिकाणी नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले व त्यात एकुण **४६,१४३** वाहने तपासण्यात आली. यात मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमांन्वये एकुण ५६७० वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली व मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या एकुण **३३३** वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली. याव्यतिरीक्त वाहतुक विभागाकडुन मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या एकुण १७,८०० वाहन चालकांवर ई–चलनद्वारे कारवाई करण्यात आली.

वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांविरूध्द कारवाई करण्याकरीता भविष्यात यापुढेही विशेष मोहिम सतत राबविण्यात येणार आहे.

सदर विशेष मोहीमेच्या अनुषंगाने जनतेस याद्वारे आवाहन करण्यात येते की, वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालक निदर्शनास आल्यास त्यांचे विरूध्द कारवाई करणेकरीता बृहन्मुंबई पोलीस दलाच्या मुख्य नियंत्रण कक्ष येथील १००/१०३/११२ या क्रमांकांवर संपर्क साधण्यात यावा.

•••